**Cri. M.A. 378/2015**

नि. १ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी रुक्कम रुपये ५,३७,०००/- एवढया रक्कमेच्या पोटगी वसुलीकरिता दाखल केलेला आहे. जाबदार यांना वेळोवेळी नोटीस व अंजामीनपात्र वारंट पाठवूनसुध्दा तो सदरकामी हजर झाला नाही. त्यास दिनांक ०३/०९/२०१६ रोजी या न्यायालयासमोर हजर केले असता त्यांने रक्कम रुपये ५०,०००/- एवढी रक्कम भरल्याचे दिसून येते. तद्‌नंतर त्यांने दिनांक ०५/१०/२०१६ रोजी रक्कम रुपये १,०००/- व दिनांक २७/१०/२०१६ रोजी रक्क्म रुपये ५,०००/- एवढी रक्कम भरल्याचे दिसून येते. तद्‌नंतर जाबदार यांनी त्यांनी देय असलेली रक्कम अर्जदार यांना दिली नसल्याचे दिसून येते. जाबदारांकडून अर्जदार यांना सुमारे ४,३९,०००/- एवढी रक्कम देय असल्याचे दिसते. आज रोजी जाबदार यांना पोलिसांनी न्यायालयासमोर हजर केले असता त्यांनी केवळ रक्कम रुपये १०,०००/- भरण्याची तयारी दर्शविली. परंतु जाबदारांकडून येणे असलेली रक्कम पहाता ती अंत्यत स्वल्प असल्याचे दिसून येते त्यामुळे त्यांचा त्यासंबंधीचा अर्ज नामंजूर करण्यात आला आहे. जाबदार यांनी उर्वरित रक्कम भरण्यास मुदत मागितलेली आहे. परंतु अभिलेखावरुन असे दिसून येते की, जाबदार यांना मुदत दिली असता ते रक्कम भरत नाही. त्यामुळे जाबदार यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ (३) प्रमाणे एक महिन्याच्या साध्या कैदेची शिक्षा देणे आवश्यक आहे. सबब जाबदार यांना दिनांक १३/११/२०२१ ते १२/१२/२०२१ अश्या एक महिन्याची साध्या कैदेची शिक्षा देण्यात येत आहे. जाबदार यांनी थकित रक्कम उपरोक्त शिक्षा पुर्ण होईपर्यत अदा केल्यास त्यास मुक्त करण्यात यावे.

दौंड
दिनांक – १३ /११/२०२१

(ए. ए. कळमकर )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग
दौंड, ता. दौंड, जिल्हा पुणे

<u>प्रमाणपत्र</u>

मी शपथेवर सांगतो की या पी.डी.एफ न्यायनिर्णय फाईलमधील मजकुर हा मुळ न्यायनिर्णयातील मजकुराशी शब्द–न–शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव (श्रेणी–३) | :: | डी. आर. कोरे |
| कोर्टाचे नांव | :: | श्री. ए. ए. कळमकर<br>२ रे सह दिवाणी व फौजदारी न्यायाधीश<br>क.स्तर, दौंड, ता. जि.पुणे |
| निकाल दिनांक | :: | १३/११/२०२१ |
| पिठासीन अधिका–याने निकालपत्रावर सही केलेचा दिनांक | :: | १३/११/२०२१ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | :: | १५/११/२०१९ |